पश्चिम रेल्वे

साहित्य सामग्री व्यवस्थापन विभाग

विविध साहित्य सामग्री पुरवठा

ई-प्रापण निविदा सूचना क्र. एस/२६/२०२४ दिनांक १४.०६.२०२४

अ. क्र.	बाबींचे संक्षिप्त वर्णन	प्रमाण	टी.ओ.डी.
३७२	प्लॅटफॉर्म लाइटिंगसाठी ४ फूट लांब एलईडी ट्यूब किमान १४४० लुमेनसह १ X १८डब्ल्यु एलईडी फिटिंग	२७६८३ संख्या	२७-जून-२४
३७३	नाममात्र क्रॉस सेक्शनल एरियाच्या कॉपर कंडक्टरसह वेल्डिंग केबल: ७० चौ. मिमी.	५६९१ मी.	२७-जून-२४
३७४	एलईडी आधारित आपत्कालीन लाईट युनिट	६१८ संख्या	०१-जुलै-२४
३७५	पॉवर केबल आकार २ कोर X ७० चौ. मी.मी.	२३ किमी	०१-जुलै-२४
३७६	गॅस फ्रीऑन-२२ ते आयएस-५६१०/१९९३.	१०२६३ केजी	०४-जुलै-२४
३७७	ब्रेक कंट्रोलरसाठी पीओएच किट	१४१ संच	०४-जुलै-२४
३७८	मेटलाइज्ड कार्बन पट्ट्या	१४५० संख्या	०४-जुलै-२४
३७९	पीटीसीए गाईड वायर	८०० संख्या	०५-जुलै-२४
३८०	एम.एस. अँगल आकार १३० X १३०X १५ मिमी	७५०००केजी	०८-जुलै-२४
३८१	नायलॉन चॅनल्स स्लिपरसाठी आकार २५ X ३०० X २४५ मीमी नायलॉन कॉर्ड रिईन्फोर्सड एलॉस्ट्रोमॅट्रिक पॅड आणि पीएससी स्लीपरवर १:८.५ बीजी ६० केजी टर्न आऊट मध्ये वापरासाठी नायलॉन कॉर्ड रिईन्फोर्सड जीआरएसपी	२३३ संच १०००० संख्या	०८-जुलै-२४
३८२	एम.एस. अँगल आकार २०० X २०० X २५ मिमी	१६०००० केजी	०८-जुलै-२४
३८३	सेकेरॉनसाठी बीपीएस गॅस्केट ओव्हरहॉलिंग किटसाठी एओएच/आयओएच/पीओएच किट	३२५ संच	१०-जुलै-२४
३८४	एलएचबी कोचमध्ये इलेक्ट्रो-न्यूमॅटिक प्रेशराइज्ड फ्लशिंग सिस्टमचा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वित करणे	१४४० संच	११-जुलै-२४
३८५	सीटीआरबी साठी साईड फ्रेम कि	८८३६७ संख्या	११-जुलै-२४
३८६	एकत्रित अल्ट्रॉसॉनिक आणि न्युमॅटिक	१ संख्या	१३-जुलै-२४
३८७	ईओटी क्रेन १५/५ टन चा पुरवठा, स्थापना आणि कार्यान्वित करणे	१ संख्या	१५-जुलै-२४
३८८	कॉन्टॅक्टरसाठी कॉन्टॅक्ट चा संच (फिक्स्ड आणि मोबाइल)	१९६ संच	१५-जुलै-२४
३८९	६ मिमी जाड ग्रूव्ह्ड रबर सोल प्लेट्स, ६.२ मिमी जाड कंपोझिट ग्रूव्ह्ड रबर सोल प्लेट हॉर्नसह, १०मीमी जाड जीआरएसपी	१६४०१० संख्या ३९ संच	२२-जुलै-२४
	उलट लिलाव		
२७	आरडीएसओ ड्रॉइंग क्र. टी-३७०६ ला अनुसरून ग्लास फाईल्ड नॉयलॉन-६६ इन्स्युलेटिंग लायनर्स	६३६६५९० संख्या	०२-जुलै-२४

शुध्दीपत्र

कृपया उलट लिलावाचा अनु. क्र. २५ येथे ३१.०५.२०२४ दिनांकित निविदा सूचना क्र. एस/२४/२०२४ मध्ये प्रमाण ''१४७७ कीमी'' असे वाचावे.

तपशीलवार सूचना ईएमडी, खरेदी निर्बंध आणि तपशीलवार निविदा शर्ती संबंधात कृपया वेबसाईट www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in ला भेट द्या. 0237

Like us on: facebook.com/WesternRly • Follow us on: twitter.com/WesternRly

---

DBS

लिलाव सूचना

सदर कळविण्यात येते की आमच्या बँकेच्या खालील नमुद दागिणे कर्ज ग्राहकांनी त्यांना अगोदर पाठविलेल्या त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर रितसर पोचपावतीसह रजिस्टर्ड पोस्टाने आणि आम्ही वारंवार विनंती करुनही त्यांच्या कर्ज खात्याची तडजोड करण्यास कसूर केली आहे.

२४.०६.२०२४ रोजी किंवा पूर्वी संपूर्ण कर्ज रकमेची तडजोड न केल्यास कर्जदारांनाद्वारे तारण ठेवलेल्या सिक्युरिटीज ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://egold.auctiontiger.net येथे किंवा बँकेच्या परिसरात जाहीर लिलाव विक्रीद्वारे बँकेच्या संपूर्ण समाधानासाठी आणि पुढील सूचनेशिवाय **२४.०६.२०२४ रोजी स. ११.०० वा.** किंवा बँकेच्या सोईने कोणत्याही अन्य तारखेस लिलावाने विकण्यात येईल.

सं.क्र.	ग्राहकाचे नाव	शाखेचे नाव	ढोबळ वजन	निव्वळ वजन
८२९३१५९५	दिगंबर हरिभाऊ सानप	नाशिक	१०.१०	८.८०

दिनांक : १४.०६.२०२४ — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : चेन्नई — **डीबीएस बँक इंडिया लिमिटेड**

***डीबीएस बँक इंडिया लिमिटेड** ही डीबीएस बँक इंडिया लिमिटेड, सिंगापूर कडील संपूर्ण परवान्याच्या अंतर्गत उपकंपनी आहे.

---

pnb punjab national bank Together for the better

सर्कल सस्त्र सेंटर, मुंबई शहर, यु.बी.आय. टॉवर, ६वा मजला, २५, सर पी.एम. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल: cs6041@pnb.co.in

जोडपत्र IV
(नियम ८(I) पहा)

कब्जा सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार पंजाब नॅशनल बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (अ‍ॅक्ट), २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या कलम १३ अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून ०५/११/२०१८ रोजी मागणी सूचना जारी करुन कर्जदार/हमीदार/गहाणदार **श्री. तानाजी श्यामराव थोरात आणि श्रीम. वर्षा टी. थोरात** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. २४,९२,३७२/- (रुपये चोवीस लाख ब्याण्णव हजार तीनशे बहात्तर मात्र)** १५.१०.२०१८ रोजीस सह त्यावरील पुढील व्याज आणि खर्च ही रक्कम या सूचनेच्या तारखेपासून/सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यास सांगितले होते.

कर्जदार/हमीदार/गहाणदार यांनी सदरहू रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार/हमीदार/गहाणदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी त्याला/तिला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून सदरहू अधिनियमाचे कलम १३(४) सहवाचता सदर नियमाच्या नियम ८ अन्वये **१२ जून, २०२४** रोजी यात याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा कब्जा घेतलेला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार/गहाणदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा पंजाब नॅशनल बँकेच्या रक्कम **रु. २४,९२,३७२/- (रुपये चोवीस लाख ब्याण्णव हजार तीनशे बहात्तर मात्र)** १५.१०.२०१८ रोजीस सह संपूर्ण प्रदानापर्यंतचे त्यावरील पुढील व्याज आणि खर्चाच्या भाराअधीन राहिल.

तारण मत्तेच्या भरण्याकरीता उपलब्ध वेळेच्या संदर्भामध्ये अ‍ॅक्टच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधुन घेतले जात आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. ३०१, ३रा मजला, ए विंग, सप्तगिरी अपार्ट. सीएचएस. लि., सेक्टर-९, ऐरोली, नवी मुंबई ४००७०८ चे गहाण.

सही/-
दिनांक : १२/०६/२०२४ — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण: नवी मुंबई — **पंजाब नॅशनल बँक**

मुंबई येथील लघुवाद न्यायालयातील
आर.ए.ई. वाद क्र. ४७६ सन २०२३
मधील/आणि
निशाणी क्र. ९

निल रिअ‍ॅल्टी प्रा. लि.)
कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत स्थापित एक कंपनी)
जीचे नोंदणीकृत कार्यालय आहे- ४०५, हिंद राजस्थान सेंटर,)
९५, डी.एस. फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.)
प्रतिक वीरा, वय- ४० वर्षे,)
प्राधिकृत व्यक्ती) ... वादी

विरुद्ध

१. **इंटरनॅशनल केमिकल्स**)
एक भागीदारी संस्था जीचा पत्ता आहे- प्लॉट क्र. १००, डी.एस. फाळके रोड,)
दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४. आणि दुकान क्र. ५, श्री कृष्णा बिल्डिंग,)
डी.एस. पी. रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४ च्या संबंधात भाडेकरू.)
२. **कमलेश संपतलाल मेहता**)
वयः ६२ वर्षे, इंटरनॅशनल केमिकल्सचे भागीदार,)
ज्यांचा पत्ता आहे- प्लॉट क्र. १००, डी.एस. फाळके रोड, दादर (पूर्व),)
मुंबई-४०० ०१४. पेशाः व्यवसाय.)
३. **उदय संपतलाल मेहता,** वयः प्रौढ माहीती नाही)
इंटरनॅशनल केमिकल्सचे भागीदार, ज्यांचा पत्ता आहे- प्लॉट क्र. १००,)
डी.एस. फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४. पेशाः व्यवसाय.)
४. **अरविंद उमरशी नागदा,** मोरया चे प्रोप्रायटर,)
वयः प्रौढ, माहिती नाही पेशाः व्यवसाय)
ज्यांचा पत्ता आहे- दुकान क्र. ५, श्री कृष्ण बिल्डिंग, डी.एस. पी. रोड,)
दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४.)... प्रतिवादी

प्रति,
उपरिनामित प्रतिवादी क्र. ४,

ज्याअर्थी, उपरिनामित वादींनी प्रतिवादींविरुद्ध वरील वाद दाखल करुन त्यांत विनंती केली की, ह्या नामदार न्यायालयाने कृपा करुन दुकान क्र. ५, मोजमाप २० चौ. मी, उंची १३ फूट व माळा १०४ चौ. फूट, तळ मजला, श्री कृष्ण बिल्डिंग नं. २, सीटीएस क्र. ७७, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४ ही वादग्रस्त जागा रिकामी करुन तिचा रिकामा आणि शांततापूर्ण कब्जा वादींच्या हवाली करण्याचे प्रतिवादींना हुकुम व आदेश आणि निर्देश द्यावेत तसेच ह्या नामदार न्यायालयाने कृपा करुन वादग्रस्त जागेचा दरम्यानचा नफा वादींकडे अदा करण्याचे हुकुम व आदेश आणि निर्देश प्रतिवादींना द्यावेत आणि दरम्यानची नफा रकम ठरवण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश २०, नियम १२ अन्वये एक चौकशी करण्याचे आदेश व निर्देश द्यावेत आणि वादात विनंती केलेल्या अशा अन्य आणि पुढील अनुतोषांसाठी.

आणि ज्याअर्थी, उपरिनामित वादींनी निशाणी क्र. ९ हा अर्ज २१ एप्रिल, २०२३ रोजी काढून त्यांत विनंती केली की, वादाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असल्याने, ह्या नामदार न्यायालयाने कृपा करुन तात्पुरता मनाई हुकुम आणि आदेश पारित करुन प्रतिवादींना वादग्रस्त जागेत व्यवहार न करण्याचे आणि/किंवा कोणत्याही त्रयस्थ पक्षाचे अधिकार न बनवण्याचे तसचे कोणत्याही सामंजस्य, करार आणि/किंवा व्यवस्थेने तिसऱ्या व्यक्तीला सामावून न घेण्याचे आणि/किंवा अन्यसंक्रमीत न करण्याचे आदेश व निर्देश द्यावेत आणि अर्जात विनंती केलेल्या अशा अन्य आणि पुढील अनुतोषांसाठी.

तुम्हाला याद्वारे अर्जाविरुद्ध कारणे दाखवण्या साठी १९ जून, २०२४ रोजी दु. २.४५ वा. व्यक्तीशः किंवा रितसर निर्देश दिलेल्या वकीला मार्फत न्यायालय खोली क्र. १०, ०४था मजला, लघु वाद न्यायालयाची जुना इमारत, एल.टी. मार्ग, मुंबई-४०० ००२ मधील पीठासिन सन्माननीय न्यायाधीशांसमोर हजर होण्याची ताकीद देण्यांत येते, कसूर केल्यास, सदर अर्जावर एकतर्फे सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

तुम्हाला सदर वाद आणि मनाई हुकुमाच्या अर्जाची प्रत ह्या न्यायालयाच्या न्यायालय खोली क्र. १० मधून मिळू शकेल.

न्यायालयाच्या शिक्क्याने ह्या २ मे, २०२४ रोजी दिले. (शिक्का)

प्रबंधक

---

pnb Housing Finance Limited

नोंदणी. कार्यालय : ९वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली-११०००१, दूरध्वनी: ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाईट: www.pnbhousing.com

मुंबई शाखा :- पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, २बी, दुसरा मजला, अमेया पार्क, नवापूर रोड, बोईसर (पश्चिम), महाराष्ट्र - ४०१५०१

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीसाठी)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. चे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अन्वये आणि एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ च्या नियम ८(१) च्या अनुपालनात आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोरील तारखेस एक मागणी सूचना जारी करून संबंधित कर्जदारांना प्रत्येक खात्यासमोर दिलेल्या रकमेची परतफेड सदर सूचनेच्या प्राप्तीची तारीख/सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकती/तीं चा कब्जा त्यांना सदर अ‍ॅक्टच्या कलम १३(४) सहवाचता सदर रूल्सच्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोरील तारखेस घेतला.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, मिळकतीशी व्यवहार करू नये आणि मिळकतीशी केलेला कोणताही व्यवहार पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. च्या रकमा व कर्ज कराराप्रमाणे त्यावरील व्याज अशा रकमेसाठी भाराअधीन राहील. **कर्जदारांचे लक्ष तारण मत्तांच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात अ‍ॅक्टचे कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.**

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदार/सह-कर्जदार / जामीनदार यांचे नाव	मागणी सूचनेची तारीख	थकबाकी रक्कम	कब्जा घेतल्याची तारीख	गहाण मिळकतींचे वर्णन
१.	एचओयु/एमयुएम/०८१७/४१९७५७ आणि एचओयु/एमयुएम/०११८/४७७४०५, शा. का. मुंबई	श्री. राकेश त्रिपुरारी त्रिपाठी **(कर्जदार)**, श्री. त्रिपाठी अखिलेश त्रिपुरारी **(सह-कर्जदार)**	१४.०८.२०२३	रु. ८७,७७,०४८.७८/- (रुपये सत्याऐंशी लाख सत्त्याहत्तर हजार अठ्ठेचाळीस आणि अठ्याहत्तर पैसे मात्र)	१२.०६.२०२४ **(सांकेतिक)**	विंग ए, ५.० , ५०३.०, अहुजा ०२, सीटीएस क्र. ४७५(भाग), स्वदेशी मिल्स कंपाऊंड, चुनाभट्टी सायन, मुंबई-४०००२२, अमेय अमेय अपाटमेंटच्या समोर, मुंबई, महाराष्ट्र- ४०००२२., भारत
२.	एचओयु/एमयुएम/०६१७/३९४५३३, शा. का. मुंबई	श्री. प्रणव अश्विन व्होरा **(कर्जदार)**, कु. धारा प्रणव व्होरा **(सह-कर्जदार)**	१४.०३.२०२४	रु. ५४,०१,१८०.४९/- (रुपये चोपन्न लाख एक हजार एकशे ऐंशी आणि एकोणपन्नास पैसे मात्र)	१२.०६.२०२४ **(सांकेतिक)**	फ्लॅट क्र. ४०३, ४था मजला, ए-विंग, तुलसी सोनाटा, साई नगर, जुने पनवेल, पनवेल, रायगड, महाराष्ट्र- ४१०२०६.

ठिकाण: महाराष्ट्र दिनांक: १२.०६.२०२४ — **प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि.**

प्रत्यक्ष कब्जा सूचना

ICICI Bank | **शाखा कार्यालय:** आयसीआयसीआय बँक लि., कार्यालय क्रमांक २०१-बी, २रा मजला, रोड क्र.१, प्लॉट क्र.-बी३, वायफाय आयटी पार्क, वागळे इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे, महाराष्ट्र- ४००६०४.

ज्याअर्थी,

निम्नस्वाक्षरीकार हे आयसीआयसीआय बँकचे प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून मागणी सूचना जारी करून खालील नमूद कर्जदारांस सूचनेतील नमूद रकमेची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या ६० दिवसांत करण्यात सांगितले होते.

रकमेची परतफेड करण्यास कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा कब्जा त्याला/तिला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर अ‍ॅक्टच्या कलम १३(४) अंतर्गत सहवाचता सदर रुल्सच्या नियम ८ अन्वये खालील नमूद तारखेस घेतला आहे. विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या भाराअधीन राहील.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव/ कर्ज खाते क्रमांक	मिळकतीचे वर्णन/ प्रत्यक्ष कब्जाची तारीख	मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रू.)	शाखेचे नाव
१.	परेश भावानजी खत्री/ बिंदिया परेश खत्री/ (एलबीपीव्हीएल००००२४२५८०६/ एलबीटीएनई००००२४२५८१४)	फ्लॅट क्र. ५०४, ५वा मजला, शिव कृपा सीएचएसएल., रामचंद्र नगर, गाव गजबंधन पाथर्ली, मानपाडा रोड, प्लॉट क्र. २०, २२ आणि २४, सर्व्हे क्र. ८४/२भा., डोंबिवली पूर्व, ठाणे-४२१२०४/ ११ जुन, २४.	जुलै ०६, २०२१ रू. १२,३३,७३९.००/-	ठाणे
२.	रेणु अजित सिंग/ अजित हनुमान सिंग/ एलबीटीएनई००००५१९८२४७.	फ्लॅट क्र. ४०४, ४था मजला, बिल्डिंग क्र. ५बी, पॅरामाऊंट एनक्लेव्ह, माहिम रोड, स. क्र. १०२३/९, १०२३/९/१, जेपी इंटरनॅशनल शाळेजवळ, पालघर पश्चिम-४०१४०४/ १२ जुन, २४.	जुलै १८, २०२३ रू. १७,७०,७६९.००/-	पालघर

वरील नमूद कर्जदार/हमीदार यांना रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे ३० दिवसांची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत तरतुदींनुसार सदर सूचना प्रसिध्दी तारखेपासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर गहाण मिळकतीची विक्री करण्यात येईल.

दिनांक : जुन १५, २०२४ — **प्रामाणिकपणे प्राधिकृत स्वाक्षरीकार**
ठिकाण: महाराष्ट्र — **आयसीआयसीआय बँक लि. करीता**

ICICI Home Finance | **नोंदणीकृत कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९, इंडिया

शाखा कार्यालय : शॉप क्र. ३०१, ३०२, ३०३, ३रा मजला, लेव्हल मॉलच्या बाजूला, हॉटेल ग्रँड मेहफिलच्या समोर, कॅम्प रोड, अमरावती-४४४६०१
शाखा कार्यालय : १ला मजला, गोकुळ रोशन, प्लॉट क्र. २५ आणि २६, झेंडा चौक, धरमपेठ, नागपूर-४४०००१

(नियम ८ (६) साठी परंतुके) पहा

स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे नियम ८(६) चे परंतुकान्वये स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

विशेषतः सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गाण/प्रभारित आहे, जिचा **प्रत्यक्ष कब्जा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदाराचेनाव/ कर्ज खाते क्र.	तारण मत्तेचा तपशील सह काही असल्यास ज्ञात भार	थकीत रक्कम	राखीव किंमत / इसारा अनामत रक्कम	मिळकतीच्या निरीक्षणाची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख व वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१.	संतोष रघुनाथ राऊत (कर्जदार) मंजुषा संतोष राऊत (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएएमआय००००१५१६६२१ आणि एलएचएएमआय००००१५१६६१८	जुने मिळकत क्र. ४१०, नझुल शीट क्र.९२/ए, प्लॉट क्र. १३, येथे भाजी बाजार खामगाव को-ऑपरेटिव्ह बँक जवळ सराफा लाईन मेन रोड अमरावती मौजे अमरावती प्रगणे बडनेरा अमरावती महाराष्ट्र-४४४६०१	रु. ४१,५१,८६१/- जून ११, २०२४	रु. ३३,७४,४६०/- रु. ३,३७,४५०/-	जून २६, २०२४ स.११.०० ते दु.३.००	जुलै ०३, २०२४ दु.२.०० ते दु.३.००
२.	प्रतीक आर सोमकुवर (कर्जदार) रविकांत वासुदेव सोमकुवर (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएनएजी००००१४२१३२५ आणि एलएचएनएजी००००१४२१३२३	प्लॉट क्र. १८, पी एच क्र. ४५, जुने खसरा क्र. १७/१, नवीन खसरा क्र.१७/१-ए, मौजे टाकळी, तहसील हिंगणा जिल्हा नागपूर, ग्रामपंचायत रायपूर, महाराष्ट्र	रु. १५,६२,९५६/- जून ११, २०२४	रु. १२,९४,७०४/- रु. १,२९,४८०/-	जून २६, २०२४ स.११.०० ते दु.३.००	जुलै ०३, २०२४ दु.२.०० ते दु.३.००

ऑनलाईन लिलाव हा लिलाव एजन्सी **ग्लोब टेकची** वेबसाईट **(युआरएल लिंक-https://BestAuctionDeal.com)** वर करण्यात येईल. गहाणदार/नोटीसी यांना **जुलै ०२, २०२४ रोजी सायं. ५.००** पूर्वी पर्यंत पुढील व्याजासह एकूण थकबाकी भरण्याची अंतिम संधी देण्यात येत आहे, अन्यथा तारण मत्ता वरील वेळापत्रकाप्रमाणे विकण्यात येईल.

संभाव्य बोलीदारांनी **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, शॉप क्र.३०१, ३०२, ३०३, ३रा मजला, लेव्हल मॉलच्या बाजूला, हॉटेल ग्रँड मेहफिल च्या समोर, कॅम्प रोड, अमरावती-४४४६०१** येथे इसारा अनामत रक्कम (इअर) चा डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई मध्ये उल्लेखित) **जुलै ०२, २०२४ किंवा पूर्वी दु. ०४.०० पूर्वी** सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांनी इअर प्रदानाच्या पुरव्याकरिता बँक अ‍ॅकनॉलेजमेंट डीडीच्या स्कॅन इमेजसह **मे ०२, २०२४ किंवा पूर्वी दु. ५.०० पूर्वी** वरील नमुद वेबसाईटमार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. कृपया नोंद घ्यावी की, जर संभाव्य बोलीदारांना जर वेबसाईट मार्फत त्यांचे प्रस्ताव सादर करणे शक्य नसेल तर निविदा दस्तावेजांची स्कॅन्ड प्रत **जुलै ०२, २०२४ किंवा पूर्वी सायं. ५.०० पूर्वी आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, शॉप क्र.३०१, ३०२, ३०३, ३रा मजला, लेव्हल मॉलच्या बाजूला, हॉटेल ग्रँड मेहफिल च्या समोर, कॅम्प रोड, अमरावती-४४४६०१** येथे सादर करावी. इसारा अनामत रकमेचा डी/डी **अमरावती, नागपूर** येथे देय **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-लिलाव** च्या नावे नॅशनलाईज्ड/शेड्युल्ड बँकेवरील असणे आवश्यक आहे.

निरिक्षण, लिलावाच्या अटी आणि शर्ती किंवा निविदा सादर करण्याच्या संदभातील पुढील कुठल्याही स्पष्टिकरणासाठी कृपया ९९२०८०७३०० वर **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड** यांना किंवा मार्केटिंग पार्टनर **नेक्सझेन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड** यांना संपर्क करावा.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया **https://www.icicihfc.com/** यावर भेट द्या.

दिनांक : **जून १६, २०२४** — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : **अमरावती, नागपूर** — **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

डॉईश बँक एजी

जाहीर सूचना - मिळकतीची लिलाव नि विक्री

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अन्वये स्थावर मिळकतीची विक्री

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **डॉईश बँक एजी,** ज्यांचे व्यवसायाच्या ठिकाणांपैकी एक अदालत रोड, औरंगाबाद - ४३१००१ चे प्राधिकृत अधिकारी **(''डॉईश बँक एजी'')** यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस अ‍ॅड एन्फार्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (''अ‍ॅक्ट'') च्या कलम १३ (२) सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ (रुल्स) च्या नियम ३ अन्वये मागणी सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत सूचनेत नमूद केल्याप्रमाणे त्यावरील व्याज आणि **१३/१०/२०२० रोजीस रु. १०,४५,९०५.५५/- (रुपये दहा लाख पंचेचाळीस हजार नऊशे पाच आणि पंचावन्न पैसे मात्र)** ची थकबाकी रक्कम चुकती करण्यासाठी कर्जदार/सह-कर्जदार **सपना विरेन जयस्वाल आणि विरेन उत्तमलाल जयस्वाल,** राहतात येथे फ्लॅट क्र. १०३, टॉवर के, शमित ऑक्टोझोन, गट क्र. ४५, नक्षत्रवाडी, औरंगाबाद - ४३१००५ यांना बोलाविण्यासाठी **१३/१०/२०२०** दिनांकीत मागणी सूचना जारी केली होती.

थकबाकी रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरले त्यामुळे कर्जदार आणि सामान्य नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर अ‍ॅक्टच्या नियम ८ सहवाचता अ‍ॅक्टच्या कलम १३(४) अन्वये निम्नस्वाक्षरीकारांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून सदर थकबाकी रकमेची वसुली करण्याकरिता खालील उल्लेखित बँकेसह गहाण मिळकतीचा कब्जा घेतला.

अ. क्र.	तारण मिळकतीचा पत्ता	राखीव किंमत	इअर	लिलाव दिनांक
१.	फ्लॅट क्र. १०३, टॉवर के, शमित ऑक्टोझोन, गट क्र. ४५, नक्षत्रवाडी, औरंगाबाद ४३१००५ चे ते सर्व भाग आणि विभाग.	**रु. २९,००,०००/-**	**रु. २,९०,०००/-**	**२४ जुलै, २०२४**

आता सर्वसामान्य जनतेला याद्वारे कळविण्यात येते की, मिळकत खाली वर्णन केलेल्या अटी व शर्तीं आणि प्रक्रियेनुसार मोहोरबंद पाकिटातून बोली मागवून **२४ जुलै, २०२४ रोजी दु.४ वा.** डॉईश बँक एजी, निरलॉन नॉलेज पार्क, बी१, २रा मजला, गोरेगाव पूर्व, मुंबई - ४०००६३ येथे ''जे आहे जेथे आहे'' तत्त्वाने आणि ''जे आहे जसे आहे'' तत्त्वाने विकण्यात येईल.

मिळकतीच्या संबंधातील तपशील बँकेच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे वर्णन केले आहेत, तथापि सदर तपशिलांमधील कोणत्याही त्रुटी, गैरविधाने किंवा उणिवांसाठी ती जबाबदार नसेल. म्हणून निविदाकार/प्रस्तावकर्ते/संभाव्य बोलीदार/खरेदीदार यांनी त्यांच्या स्वत:च्या हितासाठी निविदा सादर करण्यापूर्वी मिळकतीच्या संबंधातील त्यांची स्वत:ची खात्री करून घ्यावी. बँकेच्या सर्वोत्तम समजुतीप्रमाणे मिळकतीवर कोणतेही भार नाहीत आणि योग्य कायदेशीर प्रक्रिया वापरून मिळकतीची विक्री करण्याचा अधिकार बँकेला आहे.

जाहीर लिलावाच्या अटी आणि शर्ती :

१. मिळकतीचे निरीक्षण **२२ जून, २०२४** रोजी **स. ११.०० ते सायं. ५.००** दरम्यान करता येईल. सदर बोली ह्या डॉईश बँक एजी येथे अदालत रोड, औरंगाबाद - ४३१००१ येथे डॉईश बँक एजी च्या कार्यालयात पोहोचतील अशा बेताने **''मे. डॉईश बँक एजी ''** च्या नावे इसारा अनामत रकमेसाठी (''इअर'') **रु. २,९०,०००/- (रुपये दोन लाख नव्वद हजार मात्र)** चे डिमांड ड्राफ्ट/ पे ऑर्डर सहित निम्नस्वाक्षरीकारांच्या कार्यालयात एका मोहोरबंद पाकिटातून बोली **२४ जुलै, २०२४** रोजी **दु. २.०० पर्यंत** सादर कराव्यात. इसारा अनामत रकमेवर कोणतेही व्याज नसेल.

२. जो प्रस्ताव रितसर भरला जात नाही किंवा इअर सोबत नसलेला प्रस्ताव किंवा येथे नमूद तारिख आणि वेळ नंतर प्राप्त झालेला प्रस्ताव वैध प्रस्ताव मानला जाणार नाही आणि त्यानुसार रद्द केल्या जातील. इअर वर कोणतेही व्याज देय असणार नाही.

३. बोली प्रपत्रासहित प्रस्तावित बोलीदारांनी (पासपोर्ट, इलेक्शन कमिशन कार्ड, रेशन कार्ड, ड्रायव्हिंग लायन्सस इ.) सारखे त्याच्या/तिच्या ओळखीचे पुरावे, वास्तव्याचे पुरावे आणि आयकर विभागाने जारी केलेल्या पॅन कार्डची प्रत जोडावी.

४. विक्रीच्या तारखेस, रितसर प्राप्त झालेल्या सर्व बोली उघडल्या जातील आणि राखीव किंमतीच्यावर असल्यास, सर्वोच्च बोलीदारांची बोली बँकेकडून स्वीकारली जाईल. तथापि, लिलावाच्या ठिकाणी व्यक्तिश: हजर असलेल्या बोलीदारांना सर्वोच्च बोलीदारांनी देऊ केलेल्या किंमतीपेक्षा किमान **रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र)** जास्त रक्कम देऊ केल्यास त्यांची बोली किंमत पुढे वाढविण्याचा अधिकार असेल आणि अशा त्याहून जास्तीची बोली स्वीकारण्याचा अधिकार बँकेला असेल. बँकेने विक्री संमत केल्यानंतर, खरेदीदारांना विक्री किंमतीच्या **२५% (पंचवीस टक्के)** निम्नस्वाक्षरीकारांकडे तात्काळ इसारा अनामत रक्कम समायोजित करून भरावी लागेल.

५. त्यांना योग्य आणि वाजवी वाटतील अशा अटी व शर्तींच्या अधीन त्यांच्या स्वेच्छेने बँक मुदतवाढीच्या विनंतीस मान्यता देऊ शकते. खरेदीची उर्वरित किंमत रक्कम खरेदीदारांनी मिळकतीच्या विक्रीच्या मंजुरी नंतर पंधराव्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा पक्षकारांनी लेखी स्वरूपांत कबूल केलेल्या वाढीव मुदतीत बँकेला प्रदान करायची आहे. निर्धारित कालावधीत संपूर्ण मोबदला रकमेचे प्रदान करण्यांत कसूर केल्यास बँक इ.अ.र आणि/किंवा खरेदीदारांनी केलेले अन्य कोणतेही प्रदान जप्त करण्यास आणि मिळकतीचा पुनर्लिलाव करण्यास मुक्त असेल. कसूरवार खरेदीदारांना मिळकतीवरील किंवा त्यानंतर ती ज्या रकमेस विकली जाईल त्यापैकी कोणत्याही हिश्श्यावरील अधिकार उरणार नाहीत.

६. खरेदीदारांनी सर्व प्रदान ''डॉईश बँक एजी''च्या नावातील डिमांड ड्राफ्ट/पे ऑडरच्या माध्यमातून केले पाहिजे.

७. संपूर्ण विक्री किंमत मिळाल्यावर, बँक खरेदीदार/त्यांचे नामनिर्देशिती यांच्या नावे एक विक्री प्रमाणपत्र जारी करेल आणि खरेदीदारांना मिळकतीचा कब्जा सुपूर्द करेल.

८. वरील परिशिष्टात वर्णन सदर स्थावर मिळकत निम्नस्वाक्षरीकार प्राधिकृत अधिकारी द्वारे विक्रीची निश्चिती झाल्याच्या तारखेपासून आग किंवा चोरी किंवा अन्य अपघात यामुळे नुकसान किंवा हानी यासारख्या मिळकतीशी संबंधित सर्व जोखिमींच्या सर्व बाबतीत मिळकत खरेदीदारांकडे निहित असेल आणि राहील. कोणत्याही कारणाने खरेदीदारांना विक्री रद्द करता येणार नाही.

९. इअर प्रती जमा केलेले डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर अयशस्वी बोलीदारांना परत केले जातील.

१०. सर्व हेतू करीता सदर मिळकत विक्री जे आहे जेथे आहे तत्वावर करण्यात येईल. बँकेच्या प्राधिकृत अधिकारीच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती नुसार सदर मिळकतीवर कोणताही इतर भार नाही.

११. सदर स्थावर मिळकतीच्या संबंधातील मुद्रांक शुल्क, नोंदणी आकार, हस्तांतरण आकार आणि अन्य कोणतेही आकार यासाठीचा सर्व खर्च खरेदीदारांनी करावयाचा आहे. मिळकतीच्या संबंधातील पालिका कर, मेन्टेनन्स/सोसायटी चार्जेस, वीज आणि पाणी कर, उपकर किंवा अन्य कोणतीही थकबाकी यासारखी सर्व देणी यशस्वी खरेदीदारांनी प्रदान करावी लागतील.

१२. कोणतीही किंवा सर्व प्रस्ताव किंवा सर्वोच्च प्रस्ताव स्वीकारण्यास बँक बांधील नसेल आणि कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व बोली फेटाळण्याचा तिचा अधिकार बँक राखून ठेवत आहे.

१३. बोलीदारांना स्वत: किंवा त्यांचे रितसर प्राधिकृत प्रतिनिधी यांच्याशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीला विक्री प्रक्रियेत सहभागी होण्याची अनुमती दिली जाणार नाही.

१४. जर बँकेने केलेला सर्व परिव्यय, प्रभार आणि खर्चासह एकत्रित संपूर्ण थकबाकी हि अ‍ॅक्टच्या कलम १३(८) अन्वये मिळकतीच्या विक्रीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी कोणत्याही वेळी वरील नावाच्या कर्जदारांनी भरणा केली तर मिळकत विकली जाणार नाही आणि संभाव्य बोलीदारांकडून प्राप्त झालेल्या सर्व बोली बँकेविरूद्ध कोणत्याही दायित्व/दाव्या शिवाय त्यांना परत केल्या जातील.

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स,२००२च्या नियम ८(६) आणि ९(१) अन्वये कर्जदारांना ही एक सूचना देखील आहे.

सही/- श्री. रितेश पाटील,
प्राधिकृत अधिकारी -डॉईश बँक एजी
संपर्क क्रमांक: ९८२०८४९९५१

ठिकाण: मुंबई
दिनांक : १६ जून, २०२४

Get prediction sitting at home with Palm Print

Love, romance, sex, family relations, job, wealth, home happiness, house, education, marriage, children, luck, work, honor, sorrow, illness, etc.

R. R. Mishra
Astrologer, Palmist, Numerologist, Vastu & Gems Specialist, Former TV & Press
Whatsapp & Mobile
9820113194

अस्वीकृती

ह्या वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या कोणत्याही जाहितातीमध्ये करण्यांत आलेल्या दाव्यांच्या खरेपणा किंवा सत्यतेसाठी नवशक्ति कोणतीही हमी देत नाही. अशा जाहिरातींवर कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी स्वतः चौकशी करण्याचे किंवा तज्ञांचा सल्ला घेण्याबाबत वाचकांना सूचवण्यांत येते.
ह्या वर्तमानपत्रांत प्रकाशित झालेल्या किंवा अधिकृत वेबसाईटवर ई पेपर मध्ये अपलोड केलेल्या कोणत्याही जाहिरातीमधील कोणत्याही तथाकथित दिशाभूल करणाऱ्या किंवा बदनामीकारक मजुकरासाठी किंवा त्यामधील दाव्यांसाठी भारतात किंवा परदेशातील कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी विधी न्यायालयात किंवा न्यायाधिकरणात नवशक्तिच्या मुद्रक, प्रकाशक, संपादक आणि प्रोप्रायटर यांना जबाबदार धरता येणार नाही. ते दायित्व सर्वस्वी जाहिरातदारांचे असेल ज्यामध्ये नवशक्तिची कोणतीही भूमिका असणार नाही.

जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, **सौ. क्लॉटिल्डा डीसोजा** ह्या एबी नायर रोड, जुहू, मुंबई ४०० ०४९ येथील कालुमल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. (सोसायटी) च्या भांडवल मिळकतीमधील आणि कालुमल इस्टेट अशा ज्ञात इमारतीमधील १ल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. बी/१६ आणि शेअर प्रमाणपत्र क्र. **५८** अंतर्गत जारी विभिन्न क्र. **२८१** ते **२८५** धारक प्रत्येकी रु. ५०/- च्या **५** शेअर्सच्या मालक आहेत. सदर **सौ. क्लॉटिल्डा डीसोजा** ज्या आमच्या सोसायटीच्या सदस्य आहेत त्यांच्याकडून सदर शेअर प्रमाणपत्र हरवले आहे आणि त्या आता प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी सोसायटीला विनंती करत आहेत.

कोणतीही व्यक्ती/मंडळ यांनी वरील सदर मिळकत आणि/किंवा त्यावरील कोणताही भाग किंवा विभागाच्या संदर्भात कोणताही विलेख, दस्तावेज, लिखित निष्पादित केले असल्यास आणि/किंवा त्यासंदर्भात कोणतेही विलेख किंवा दस्तावेज निष्पादित करत असल्यास आणि/किंवा त्यांना विक्री, गहाण, विश्वस्त, धारणाधिकार, ताबा, भेट, वारसा, सोडून देणे, भाडेपट्टा किंवा अन्यकाहीच्या मार्गे कोणतेही दावे किंवा आक्षेप असल्यास आणि/किंवा कसेही/कोणत्याही प्रकारे ते सदर मूळ नामाधिकार विलेख आणि दस्तावेजांचे धारक असल्यास त्यांनी तसे आम्हाला त्याच्या दस्तावेजी पुराव्यासह ह्या सूचनेच्या जारीच्या तारखेपासून **१४** दिवसांच्या आत कळवावे. कसूर केल्यास, त्याच्या/तिच्याकरिता आणि/किंवा कोणत्याही प्रकारे त्याच्या/तिच्या वतीने त्यांच्या मार्फत कोणत्याही तशा व्यक्ती/मंडळ यांच्याकडून तसे दावे किंवा मागण्या, आक्षेप किंवा अडचणी हे विचारात घेतले जाणार नाहीत आणि त्यांच्या विनंतीनुसार आमच्या अशीलांकरिता सोसायटी प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करेल.

सदर दिनांक **१६ जून, २०२४.**
आपला आभारी,
कालुमल मॅनेजमेंट कमिटीकरिता
सही/-
सन्मा. सचिव

मुंबई येथील मुंबई नगर दिवाणी न्यायालयात
दिंडोशी (बोरिवली विभाग)
संक्षिप्त वाद क्र. ३६६ सन २०२१

आयसीआयसीआय बँक लि.
द्वारा तिचे प्राधिकृत प्रतिनिधी श्री. राजेश वानखेडे, वय-४५ वर्ष, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये स्थपित बँकिंग कंपनी आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अ‍ॅक्ट, १९४३ च्या व्याख्येतील शेड्युल्ड बँक आणि कार्यालय आहे आयसीआयसीआय बँक लिमिटेड, चकली सर्कल जवळ, जुना पादरा रोड, बडोदा ३९०००७ आणि कॉर्पोरेट कार्यालय आहे आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई-४०० ०५१ आणि शाखा कार्यालय आहे एमआयडीसी टॉवर, ट्रान्स ट्रेड सेंटर जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई- ४०००९३ येथे.
... वादी

विरुध्द

सैफुल शेख
वय: प्रौढ,
ज्यांचा निवासी पत्ता: २२ए, सुरेखा विल्सन वरळीकर हाऊस, वरळी कोळीवाडा, टँक गल्ली, मुंबई- ४०००३०.
ज्यांच्या कार्यालयाचा पत्ता :
सॅमसंग सी अ‍ॅण्ड टी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सीएस क्र. २८६, प्लॉट क्र. १०७८, डॉ. अ‍ॅनी बेझंट रोड, वरळी पूर्व, कोड एसडब्ल्यू००२२००७९४, डीएसजीएन टेक्निशियन, सेंच्युरी बाजार जवळ, मुंबई- ४०००२५. **... प्रतिवादी**

सूचना घ्यावी की, सदर सन्माननीय न्यायालय खालील अनुतोषांकरिता वरील नावाच्या प्रतिवादींद्वारे १८.०७.२०२४ रोजी स. ११ वा. मध्यान्ह वेळी न्यायालय खोली क्र. ५ मधील पीठासिन सन्माननीय न्यायाधिश **श्री. ए. झेड. खान** यांच्यासमोर प्रचलित होणार आहे.

(ए) घोषित करावे की, रु. २,९२,६९०.०३/- (रुपये दोन लाख ब्याण्णव हजार सहाशे नव्वद आणि पैसे तीन मात्र) ची एकूण रक्कम निशाणी डी येथील खात्याच्या विवरणपत्रा नुसार वादींना प्रतिवादींद्वारे प्रत्यक्ष प्रदानाच्या तारखेपर्यंत ०८.०४.२०२१ पासून द.सा. २९.८८% दराने त्यावरील पुढील व्याजासह ०७.०४.२०२१ रोजीस थकीत आणि देय आहे.

(बी) सदर वादाचा खर्च पुरविण्यासाठी;

(सी) प्रकरणाच्या परिस्थितीनुसार योग्य आणि उचित वाटतील अशा पुढील आणि कोणत्याही अन्य अनुतोषांकरिता.

सदर दिनांक ०४ जून, २०२४

प्रबंधकांकरिता
नगर दिवाणी न्यायालय,
दिंडोशी येथील
सीलर

श्री./मेसर्स
वादींकरिता वकील
पत्ता :-
विधी पार्टनर्स, वकील,
२रा मजला, दराबशॉ हाऊस,
शूरजी वल्लभदास मार्ग,
बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई- ४००००१.
प्रति,
सैफुल शेख

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
भारत सरकार का उपक्रम A Government of India Undertaking

अ‍ॅसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा, मेझ्झानीन फ्लोअर, २१, वीणा चेंबर्स, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१, महाराष्ट्र
वेबसाईट : https://unionbankofindia.co.in, ईमेल - Ubin0553352@unionbankofindia.co.in

संदर्भ क्र.: एआरएमबी:एओ:केसीके:डब्ल्युपीएसए:०१:२०२४ — **दिनांक : १४.०६.२०२४**

प्रति,

मे. आर आर सिक्युरीटीज सर्व्हिसेस, प्रोप्रा. रुपेश रामचंद्र पांडे, फ्लॅट क्र. ४०३, ४ था मजला, एफ-विंग, श्री उषा कॉम्प्लेक्स, सीएचएसएल, खंडेलवाल मार्ग, भांडूप (प), मुंबई ४०० ०७८.

कै. श्री. रामचंद्र सितलाप्रसाद पांडे (हमीदार) यांचे सर्व कायदेशीर वारस (मयत पासून त्यांचे कायदेशीर वारस)

श्री. रुपेश रामचंद्र पांडे (मुलगा) **आणि श्री.राकेश रामचंद्र पांडे (मुलगा),** फ्लॅट क्र. ४०३, ४ था मजला, एफ-विंग, श्री उषा कॉम्प्लेक्स, सीएचएसएल, खंडेलवाल मार्ग, भांडूप (प), मुंबई ४०० ०७८.

कै. श्री. रामचंद्र सितलाप्रसाद पांडे (हमीदार) यांचे सर्व कायदेशीर वारस (मयत पासून त्यांचे कायदेशीर वारस)

श्री. रुपेश रामचंद्र पांडे (मुलगा) **आणि श्री.राकेश रामचंद्र पांडे (मुलगा),** फ्लॅट क्र. ३०४, ३ रा मजला, जी विंग, श्री साई उषा कॉम्प्लेक्स सीएचएसएल, खंडेलवाल मार्ग, भांडूप (प), मुंबई ४०० ०७८.

विषय: सरफैसी अ‍ॅक्टच्या कलम १३(२) अंतर्गत जारी दिनांक ०७.०४.२०२१ रोजीची सूचना आणि १३(४) अंतर्गत जारी दिनांक ०५.०८.२०२१ रोजीच्या सूचनेला अनुसरुन बँकेने स्वीकारलेले उपाय.

महोदय/महोदया

१. बँकेने **०७.०४.२०२१** रोजीच्या १३(२) सूचनेला अनुसरुन बिझनेस लोन खाते **मे. आर आर सिक्युरीटीज सर्व्हिसेस, प्रोप्रा. रुपेश रामचंद्र पांडे आणि हमीदार श्री. रामचंद्र सितलाप्रसाद पांडे** मधील तारण मत्तेच्या संदर्भात सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट (२००२) (सरफैसी अ‍ॅक्ट) अंतर्गत उपाय सुरु केले आहेत.

२. यापूर्वी जारी केलेल्या १३(२) सूचनेच्या बजावणीतील काही तांत्रिक दोष लक्षात घेता ज्यानुसार अधिकृत अधिकाऱ्यांनी उपाययोजना स्वीकारल्या होत्या आणि सरफैसी अ‍ॅक्ट च्या तरतुदींच्या अंतर्गत तिच्या थकबाकीच्या वसुलीसाठी योग्य कायदेशीर कार्यवाही करण्याचा हक्क आणि विचारांना बाधा येऊ न देता आता असे ठरविण्यात आले आहे की, दिनांक **०७.०४.२०२१** रोजीची सूचना आणि सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत पुढील कारवाई त्वरित परिणामांसह काढुन घेण्यात येत आहे. परिणामी सरफैसी अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत दिनांक **०५.०८.२०२१** रोजीची १३(४) सूचना जारी करण्यासह प्राधिकृत अधिकाऱ्यांनी उपाय योजले आणि खालील मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतला आहे आणि आता मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि सदर सांकेतिक कब्जा सोडुन दिला आहे.

श्री. रामचंद्र सितलाप्रसाद पांडे यांच्या नावे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत गाव कांजूर बीएसडी, ता कुर्लाच्या सीटीएस क्र. ४०३, ४२३, ४२५ गाव भांडूप आणि सीटीएस क्र. ६४२ (भाग) च्या प्लॉट वर स्थित असलेले फ्लॅट क्र. ४०३, ४ था मजला, एफ विंग, श्री उषा कॉम्प्लेक्स सीएचएसएल, खंडेलवाल मार्ग, भांडूप (पश्चिम), मुंबई ४०००७८, मोजमापित ७५० चौ.फू. (बिल्ट अप क्षेत्र).

आपला स्नेहांकित
युनियन बँक ऑफ इंडिया करिता
(किशोर चंद्र कुमार)
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया (इन्सॉल्व्हन्सी रिझॉल्युशन प्रोसेस फॉर कॉर्पोरेट पर्सन्स) रेग्युलेशन्स, २०१६ च्या रेग्युलेशन ६ अन्वये)
मे. कोस्टल ऑरगॅनिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंच्या माहीतीकरीता

संबंधित तपशील

१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	कोस्टल ऑरगॅनिक्स प्रायव्हेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	३१.०१.९१८५
३	कॉर्पोरेट कर्जदार ज्या अंतर्गत स्थापित/ नोंदणीकृत आहे ते प्राधिकरण	कंपनी निबंधक, मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर/ लिमिटेड लायाबिलिटी आयडेन्टिफिकेशन नंबर	यु२४११०एमएच१९८५पीटीसी०५५६९०
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालय व मुख्य कार्यालय (असल्यास) ह्यांचा पत्ता	फ्लॅट क्र. ९, दुर्गेश को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, पाटणकर वाडा, खोपोली, रायगड, महा. ४१०२०३ भारत
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या बाबतीत नादारी सुरू होण्याची तारीख	१२ जून, २०२४ च्या आदेशानुसार (१३ जून, २०२४ रोजीस प्राप्त)
७	नादारी निर्णय प्रक्रिया समाप्तीची अंदाजित तारीख	१०.१२.२०२४
८	अंतरिम निर्णय व्यावसायिक म्हणून कृती करणाऱ्या नादारी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	नाव: **कु. पूनम बसाक** **नों. क्र.** आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०१२३४/२०१८-२०१९/११९५७
९	बोर्डाकडे नोंदणीकृत अंतरिम निर्णय व्यावसायिकांचा पत्ता आणि ई-मेल	वीवर्क, २४७ पार्क, १३वा मजला, विक्रोळी कॉर्पोरेट पार्क, एलबीएस रोड, गांधी नगर, विक्रोळी पश्चिम, मुंबई शहर, महाराष्ट्र ४०००७९. ईमेल: poonamb.irp@gmail.com
१०	अंतरिम निर्णय व्यावसायिकांशी दळणवळण करण्याकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल	कु. पूनम बसाक (आयआरपी) वीवर्क, २४७ पार्क, १३वा मजला, विक्रोळी कॉर्पोरेट पार्क, एलबीएस रोड, गांधी नगर, विक्रोळी पश्चिम, मुंबई शहर, महाराष्ट्र ४०००७९. ईमेल: copl.cirp@gmail.com
११	दावे सादर करण्यासाठी अंतिम तारीख	२७.०६.२०२४
१२	अंतरिम निर्णय व्यावसायिकांनी निश्चित केलेले कलम २१ च्या पोट-कलम (६ ए) च्या खंड (बी) अंतर्गत धनकोंचे वर्ग, असल्यास	लागू नाही
१३	एका वर्गातील धनकोंचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्यासाठी ठरलेल्या नादारी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
१४	(ए) संबंधित फॉर्म्स आणि (बी) प्राधिकृत प्रतिनिधींचे तपशील येथे उपलब्ध आहेत:	i) वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads लागू नाही

याद्वारे सूचना देण्यांत येते की, राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण ने १२.०६.२०२४ दिनांकित आदेशाद्वारे कोस्टल ऑरगॅनिक्स प्रायव्हेट लिमिटेड ची एक कॉर्पोरेट नादारी निराकरण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले.

कोस्टल ऑरगॅनिक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना याद्वारे **नोंद क्र. १०** समोरील पत्त्यावर अंतरिम निर्णय व्यावसायीकांकडे **२७.६.२०२४ रोजी किंवा त्यापूर्वी** त्यांच्या दाव्यांचे पुरावे सादर करण्यास सांगण्यांत येते.

वित्तीय धनकोंनी फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातून त्यांच्या दाव्यांचा पुरावा सादर करावा. अन्य सर्व धनको व्यक्तीशः, टपालाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पुराव्यासह दावे सादर करू शकतात.

नोंद क्र. १२ समोर सूचिबद्ध केल्याप्रमाणे एखाद्या वर्गातील वित्तीय धनकोंनी फॉर्म सीए-(लागू नाही) वर्गाचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून कृती करण्याकरिता नोंद क्र. १३ समोर सूचिबद्ध केलेल्या तीन नादार व्यावसायिकांमधून प्राधिकृत प्रतिनिधींची त्यांची पसंती कळवावी.

दाव्यांच्या खोटी किंवा दिशाभूल करणारे पुराव्यांच्या सादरीकरण दंडास पात्र असेल.

दिनांक : १५.०६.२०२४ — सही/-
ठिकाण: मुंबई — कु. पूनम बसाक

LIC HFL LIC HOUSING FINANCE LTD

एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

वेस्टर्न रिजन कार्यालय : एलआयसी हाऊसिंग फायनान्स लि., कार्यालय क्र. १६१-१६६, १६ वा मजला, सी विंग, मित्तल कोर्ट, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१, दूर. +९१ २२ ४१८९ ७३००

नोंदणीकृत कार्यालय : एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, बॉम्बे लाईफ बिल्डींग, २ रा मजला, ४५/४७, वीर नरिमन रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दूर. +९१ २२ २२०४ ९६८२/९७९९/०००६.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता) (परिशिष्ट ४ (नियम ८(१)

ज्याअर्थी अधोहस्ताक्षरीत, **एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सीक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ (५४/२००२) अनुसार व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता कलम १३(१२) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार /गहाणवटदार/हमीदार **मे. निवास्ती डेव्हलोपर्स एलएलपी, श्री. अनिल रायगंगेर, श्री. अश्वीन प्रभुदास वोरा, श्री. ललित वोरा, श्री. मयूर अनिल रायगंगेर, श्रीम. मिताली लव वोरा, श्री. निमीश प्रविणधंद्रा वोरा, श्री. राजेश नरेंद्र वोरा, श्रीम. रेखा वोरा, श्री. श्याम ललित वोरा व श्रीम. उशा वोरा** यांना सूचनेत निर्देशित संपूर्ण रक्कम **रु. १४६,५८,११,०९२.४० (रु. एकशे सेहेचाळीस करोड अठ्ठावन्न लाख अकरा हजार ब्याणव व चाळीस पैसे मात्र) (दि. २९.०२.२०२४ पर्यंत मूल्यांकन केलेले)** अधिक अलागू टीडीएस, पुढील व्याज यांच्यासह अनुसार सदर रकमेचे प्रदान सदर सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्याकरिता फ्री प्रेस जरनल व नवशक्तीमध्ये **दि. १५ मार्च, २०२४** रोजी वृत्तपत्र प्रकाशन मार्फत खालील निर्देशित **मागणी सूचना दि.** २९.०२.२०२४ रोजी जारी केली होती.

कर्जदार/हमीदार/ गहाणवटदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार/हमीदार/ गहाणवटदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर नियमांच्या नियम ८ सहवाचन सदर अ‍ॅक्टच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. १३ जून, २०२४** रोजी **प्रतिकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार/ गहाणवटदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे एल.आय.सी. हाऊसिंग फायनान्स लि. यांच्या प्रभार अंतर्गत रक्कम **रु. १४६,५८,११,०९२.४० (रु. एकशे सेहेचाळीस करोड अठ्ठावन्न लाख अकरा हजार ब्याणव व चाळीस पैसे मात्र)** व त्यावरील व्याज यांच्यासह रक्कमेच्या अधीन असेल.

कर्जदार व सह-कर्जदार यांचे लक्ष वेधून घेण्यात येते की, अ‍ॅक्टच्या अनुच्छेद १३ च्या उप-अनुच्छेद (८) च्या तरतूदी अंतर्गत प्रतिभूत मालमत्तेची कपात करण्यात येईल.

स्थावर मालमत्तेचे विवरण :

फ्लॅट धारक क्र. १. ए-३०२ मोज. ९०० चौ. फूट, २. ए-३०१ मोज. ९०० चौ. फूट, ३. ए-५०१ मोज. ७२० चौ. फूट, ४. ए-६०१ मोज. ९०० चौ. फूट, ५. बी-३०२ मोज. ९०० चौ. फूट व ६. बी-६०२ मोज. ९०० चौ. फूट बिल्डींग इरैसा म्हणून ज्ञात व सर्व तो भाग व भूखंड असलेली जमिन धारक प्लॉट क्र. १, सेक्टर १९, सानपाडा, नवी मुंबई, तालूका व जिल्हा ठाणे.

कार्यालय जागा धारक क्र. १. ९०२ मोज. १७१४ चौ. फूट, २. ९०६ मोज. १०७५ चौ. फूट, ३. ९०७ मोज. ११०५ चौ. फूट, ४. १००६ मोज. १०७५ चौ. फूट बिल्डींग कॉस्टारिका म्हणून ज्ञात, सर्व तो भाग व भूखंड असलेली जमिन धारक प्लॉट क्र. १ व २ सेक्टर १८, सानपाडा, नवी मुंबई तालूका व जिल्हा ठाणे.

खालील फ्लॅट व बिल्डींग तुलसी सोनाटा म्हणून ज्ञात, बांधकामित जमिन धारक सर्व्हे क्र. ७९७, हिस्सा क्र. १/१, पनवेल गाव, तालूका पनवेल व नोंदणीकरण जिल्हा व उप जिल्हा रायगड येथील मर्यादितील.

i. फ्लॅट धारक क्र. १०६ मोज. २८२.३३ चौ. फूट १ ला मजला ए विंग
ii. फ्लॅट धारक क्र. ८०१ मोज. २८१.६२ चौ. फूट ८ वा मजला ए विंग
iii. फ्लॅट धारक क्र. १०३ मोज. २८२.३७ चौ. फूट १ ला मजला बी विंग
iv. फ्लॅट धारक क्र. १०४ मोज. २८२.३८ चौ. फूट १ ला मजला बी विंग
v. फ्लॅट धारक क्र. १०६ मोज. ४६०.९१ चौ. फूट १ ला मजला बी विंग
vi. फ्लॅट धारक क्र. २०२ मोज. २८३.०६ चौ. फूट २ रा मजला बी विंग
vii. फ्लॅट धारक क्र. ८०१ मोज. ४६०.५१ चौ. फूट ८ वा मजला बी विंग
viii. फ्लॅट धारक क्र. ९०१ मोज. ४६०.५१ चौ. फूट ९ वा मजला बी विंग
ix. फ्लॅट धारक क्र. ९०४ मोज. २८२.३८ चौ. फूट९ वा मजला बी विंग
x. फ्लॅट धारक क्र. ९०६ मोज. ४६०.९१ चौ. फूट ९ वा मजला बी विंग

मोठे दुकान तथा गोदाम क्र. एच-२६ मोजमापित १५४ चौ. मीटर वा तळ मजला बिल्डींग प्लॉट क्र. २ सेक्टर १९, गट क्र. ७९६ महसूल गाव तुर्भे तालूका व जिल्हा ठाणे.

कार्यालय ब्लॉक क्र. १. एम-३६ मोज. अंदाजे ७२८.३० चौ. फूट व २. एम-४७ मोज. अंदाजे ६७.६८५ चौ. मीटर बिल्ट अप क्षेत्रफळ ७२८.३० चौ. फूट १ ला मजला, बिल्डींग धारक जमिन प्लॉट क्र. ७ म्हणून ज्ञात, सेक्टर १९ गट क्र. ७९६ महसूल गाव तुर्भे, तालूका व जिल्हा ठाणे व नोंदणीकरण जिल्हा व नोंदणीकरण उप जिल्हा ठाणे.

खाते क्र. ६०००००००१०२ — **खाते क्र. ६०००००००११४**

सही/-
दिनांक : १३.०६.२०२४ — **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : सानपाडा/ तुर्भे/ पनवेल — **एलआयसी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**